दैनिक लोकमत, सातारा, दि. 6 जानेवारी 2012, शुक्रवार,

पान क्र. 2




संकल्पपूर्ती नामफलकाचे अनावरण करताना अविनाश धर्माधिकारी, शेजारी अविनाश भोसले, हणमंत गायकवाड, पंढरीनाथ भोसले, कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी, पांडुरंग घाडगे.

# शिवकृपा ही समाजाभिमुख पतपेढी : धर्माधिकारी

कोरेगाव | दि. ५ (प्रतिनिधी)

निकोप सहकार जोपासत अर्थकारणास अध्यात्माची जोड देणारी शिवकृपा ही राज्यात समाजाभिमुख पतसंस्था ठरली आहे, असे प्रतिपादन चाणक्य मंडलचे संचालक अविनाश धर्माधिकारी यांनी केले.

शिवकृपा सहकारी पतपेढीने एक हजार कोटींचा संमिश्र व्यवसाय पूर्ण केल्यानिमित्त चिंचवड (पुणे) येथे झालेल्या आनंद सोहळा कार्यक्रमात धर्माधिकारी बोलत होते. सोलापूर वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपसंचालक अशोक भांडवलकर, पतपेढीचे अध्यक्ष अविनाश भोसले, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, पंढरीनाथ भोसले, कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी उपस्थित होते.

मुंबई सहकार बोर्डावर संचालकपदी निवड झाल्याबद्दल कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी यांचा सत्कार करण्यात आला. संतोष देशमुख यांनी स्वागत केले. मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग घाडगे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी कृष्णा शेलार, वसंतराव चव्हाण, भीमराव बोराडे, बाळासाहेब मोहिते, सखाराम संपकाळ, जयवंत खामकर, सोपान बोराडे, अशोक तुपे, बबन काटे यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाजीराव ऐवळे व वरिष्ठ व्यवस्थापक संदीप जाधव यांनी सूत्रसंचालन केले. हणमंत गायकवाड यांनी आभार मानले.